# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>प्रसिद्धी पत्रक                                   ता. ०६ मार्च २०१९</u>

# विदर्भाची वाटचाल औद्योगिक क्रांतीकडे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## विविध विकास कामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण

**नागपूर, ता. ६ :** विदर्भाला आजपर्यंत जे मिळाले नव्हते ते मागील साडेचार वर्षात मिळाले. समृद्ध मार्ग हा विदर्भाच्या समृद्धीचा मार्ग आहे. यामुळे विदर्भ औद्योगिक क्रांतीकडे वळणार आहे. वीज वापरासाठी उद्योगांना सबसिडी दिल्यामुळे मोठमोठे उद्योग इथे येत आहेत. जनतेने आशीर्वाद दिला तर पुढील पाच वर्षात एकही काम शिल्लक राहणार नाही, असे आश्वासन देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या साडेचार वर्षात नागपूरसह विदर्भात झालेल्या चौफेर विकासाचा आलेख मांडला.

नागपूर महानगरपालिकेअंतर्गत करण्यात येणाऱ्या विविध विकास कामांसह रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर महानगर विकास प्राधिकरण आदींच्या माध्यमातून होणाऱ्या विविध विकास कामांच्या ई-भूमिपूजन आणि लोकार्पण कार्यक्रमाचे आयोजन फुटाळा तलाव बुधवारी (ता.६) येथे करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

मंचावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे ऊर्जा मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट, महापौर नंदा जिचकार, जिल्हा परिषद अध्यक्षा निशा सावरकर, खासदार अशोक नेते, आमदार सुधाकर देशमुख, आमदार अनिल सोले, आमदार सुधाकर कोहळे, आमदार कृष्णा खोपडे, आमदार डॉ. मिलींद माने, आमदार विकास कुंभारे, आमदार समीर मेघे, उपमहापौर दीपराज पार्डीकर, मनपातील

सत्तापक्ष नेते संदीप जोशी, नासुप्रचे विश्वत भूषण शिंगणे, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक ब्रजेश दीक्षित, मनपाचे आयुक्त अभिजीत बांगर, नासुप्रच्या सभापती शीतल उगले, मध्य रेल्वेचे डीआरएम सोमेश कुमार, दक्षिण मध्य रेल्वेच्या डीआरएम श्रीमती बंदोपाध्याय उपस्थित होते.

पुढे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागपूरचा विकास करताना केवळ इन्फ्रास्ट्रक्चरचाच विकास केला नाही तर समाजातील प्रत्येक घटकाला ध्यानात ठेवून विकास करण्यात आला. हा विकास म्हणजे खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक मानवी विकास होय. नागपूरात मिहानच्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्रात, सर्वीस सेक्टरच्या माध्यमातून आणि पर्यटनाच्या माध्यमातून हजारो रोजगार उपलब्ध होत आहेत. फुटाळयातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे म्यूझीकल फाऊंटेन आणि गोरेवाडा प्राणिसंग्रहालय हे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे महत्वाचे पर्यटन केंद्र होणार असून भविष्यात नागपूर ही पर्यटनाची राजधानी होईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले, अजनी येथील मल्टीमोडल हब, फुटाळा येथील आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या कलावंतांचे योगदान असलेले म्यूझीकल फाउंटेन, मेट्रोच्या पुढच्या टप्प्यातील ब्रॉडगेज मेट्रो, मेट्रो रेल्वे आणि रस्ते वाहतूक असलेला डबल डेकर पूल, सीएनजीवर चालणारी सिटी बस, इथेनॉलवर चालणारी ग्रीन बस, सांडपाण्याची विक्री करून पैसे कमविणारी महानगरपालिका हे नागपूरातील सर्व प्रयोग देशातील पहिले प्रयोग ठरले आहे. या शहराने विकासाच्या बाबतीत अनेक आंतरराष्ट्रीय विक्रम केले आहेत. भविष्यात नागपुरात तेलंगखेडीत ॲग्रो कन्व्हेन्शन सेंटर आणि मिहान येथे प्रस्तावित आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन सेंटर नागपूरची ओळख आंतरराष्ट्रीय पातळीवर करणारे राहील, असेही ते म्हणाले.

यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वात शासन काळात झालेल्या विकास कामांची आणि लोकाभिमुख निर्णयांची, त्याच्या यशस्वी अंमलबजावणीची माहिती दिली.

तत्पुर्वी दीपप्रज्वलन करून मान्यवरांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. ज्या ज्या प्रकल्पाचे ई-भूमिपूजन आणि लोकार्पण झाले त्या त्या प्रकल्पा संदर्भातील माहिती संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. माहिती दिल्यानंतर संबंधित प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी रिमोटची कळ दाबून केले.

यावेळी वाढदिवसानिमित्त आमदार कृष्णा खोपडे यांचा तर निर्धारित वेळेच्या आधी मेट्रोचे काम पूर्ण करणारे मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक ब्रजेश दीक्षित यांचा ना. देवेंद्र फडणवीस व

ना.नितीन गडकरी यांनी शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. ना. नितीन गडकरी यांच्या विकास कार्याचा आढावा घेणाऱ्या 'मी खासदार' या सीडीचे लोकार्पण आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट यांच्या मतदार संघातील विकास कामांचा आढावा घेणाऱ्या 'पुणे' या पुस्तकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पश्चिम नागपूर विधानसभा मतदार संघाच्या वतीने आमदार सुधाकर कोहळे आणि मंडळ अध्यक्ष किसन गावंडे यांनी दोन्ही नेत्यांचा सत्कार केला. संचालन रेणुका देशकर यांनी केले तर आभार आमदार सुधाकर देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला नागपुरातील हजारो नागरिकांची उपस्थिती होती. टेकडी गणेश ट्रस्टच्या वतीने पुलवामा येथील शहीद जवान कुटुंबियांच्या मदतीकरीता २१ लाख रूपयांच्या मदतीचा धनादेश पंतप्रधान सहायता निधीच्या नावाने मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द करण्यात आला.

**या प्रकल्पांचे झाले भूमिपूजन**

**नागपूर महानगरपालिका :** जुन्या पथदिव्यांचे नवीन एलईडी पथदिव्यांमध्ये परावर्तीत करण्याच्या कामाचा शुभारंभ, सीमेंट रस्ते टप्पा क्र. तीन अंतर्गत होणाऱ्या ३९.४३ किमी लांबीच्या रस्ता कामाचे भूमिपूजन, अमृत योजनेंतर्गत जागृती कॉलनी येथील ३९ लक्ष किंमतीच्या आणि शास्त्री लेआऊट येथील ८७ लक्ष रूपये खर्चाच्या उद्यानाचे भूमिपूजन, मेट्रो रेल्वे मार्गावरील १९ कोटी रूपयांच्या प्रकाश इन्फ्रास्ट्रक्चरचे भूमिपूजन, ४२ मेगा वॅट सोलर प्रकल्पाचे भूमिपूजन.

**नागपूर सुधार प्रन्यास :** फुटाळा तलाव येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या म्युझिकल फाऊंटेन कामाचे भूमिपूजन अंबाझरी येथील लाईट अ‍ॅण्ड साऊंड शो कामाचा शुभारंभ, वाठोडा, तरोडी खु., वांजरी येथील ४२२ कोटी किंमतीच्या पंतप्रधान आवास योजनेंतर्गत करण्यात आलेल्या कामाचे लोकार्पण व अन्य कामांचा शुभारंभ.

**दक्षिण मध्य रेल्वे :** नागपूर-नागभीड ब्रॉडगेज कन्व्हर्शन परियोजना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर विमानतळावर रेल्वे आरक्षण केंद्राचे लोकार्पण.

**मध्य रेल्वे :** अजनी रेल्वे स्थानकावरील एक्सलेटर, मध्य रेल्वे नागपूर मंडळांतर्गत होणाऱ्या विविध विकास कामांचे भूमिपूजन.

**एनएचएआय आणि आरएनडीए यांच्यामध्ये अजनी इंटरमॉडेल स्टेशन संदर्भात झाला सामंजस्य करार**

इन्स्टिट्युट ऑफ ड्रायव्हींग, ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सब सेंटरचे भूमिपूजन.

**सार्वजनिक बांधकाम विभाग :** केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत विविध विकास कामांचे ई-भूमिपूजन.